**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**

कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३

piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/३५८८८७/२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक-१४/०९/२०२३

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

निगडी वाहतूक विभागात दिनांक १६/०९/२०२३ भक्ती शक्ती चौक येथे भक्ती शक्ती शिल्प स्मारक निगडी पुणे याठिकाणी ३५० वे हिंदू साम्राज्य वर्षे/शिव राज्याभिषेक वर्षे अखिल पिंपरी चिंचवड शिवजयंती समन्वय समिती व पिंपरी चिंचवड ढोल ताशा महासंघ यांचा कार्यक्रम असल्याने दहा हजार ते वीस हजार जनसमुदाय येणार आहे. भक्ती शक्ती चौक या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरीकांची वर्दळ होवुन वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डॉ.शिवाजी पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात खालीलप्रमाणे वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

### निगडी वाहतूक विभाग

१. देहुरोडकडुन येणारी वाहतूक हि भक्ती शक्ती चौकामध्ये न येता ती उड्डाणपुलावरुन ग्रेडसेप्रेटरमधुन जावुन रुद्रा पार्किंगच्या समोरील आऊटमधुन बाहेर पडुन इच्छितस्थळी जाईल,

२. त्रिवेणीनगर चौकाकडुन येणारी वाहतूक हि भक्ती शक्ती ब्रिजवर न चढता ती डाव्या बाजूच्या रोडने टिळक चौक तसेच भक्ती शक्ती भुयारी ब्रिजच्या खालुन अप्पुघर मार्गे इच्छित स्थळी जाईल

३. अप्पुघर/रावेतकडुन येणारी वाहतूक व ट्रान्सपोर्टनगर मधुन येणारी वाहतूक हि भक्ती शक्ती ब्रिजवर न चढता ती भक्ती शक्ती भुयारी ब्रिजच्या खालुन अंकुश चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल.

४. संभाजी चौकाकडुन भक्ती शक्ती चौकाकडे येणारी वाहतूक हि भक्ती शक्ती ब्रिजवर न चढता ती भेळ चौक येथे लोकमान्य हॉस्पीटलमार्गे टिळक चौकातुन इच्छित स्थळी जातील.

५. काचघर चौकाकडुन भक्ती शक्ती चौकाकडे येणारी वाहतूक हि भक्ती शक्ती ब्रिजवर न चढता ती काचघर चौकातून उजव्याबाजूने वळुन गांधी हॉस्पीटलमार्गे टिळक चौक येथुन इच्छितस्थळी जातील.

६. टिळक चौकाकडुन भक्ती शक्ती चौकाकडे येणारी वाहतूक हि भक्ती शक्ती चौकाकडे न येता ती एस.बी.आय समोरील इन मधुन ग्रेडसेपरेटर मार्गे भक्ती शक्ती उड्डाणपुलावरुन देहुरोड मार्गे इच्छितस्थळी जातील.

तरी वरील नमुद ठिकाणांवरील वाहतुक बदल दि. १६/०९/२०२३ रोजी १४.०० ते कार्यक्रम संपेपावेतो अथवा वाहतुक सुरळित होईपर्यंत अत्यावश्यक सेवेतील (उदा.फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) वाहने वगळुन सर्व प्रकारचे वाहतुकीसाठी बंद करण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

१४/०९

(डॉ.शिवाजी पवार)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी सांगवी वाहतुक विभाग,

Scanned with CamScanner